Literacy for a Billion

Movie: Gadhavache Lagna
Year: 2007

Song: Rumak Zumak  Janu
Lyricist:

छननन छुमछुम
तननन तुमतुम
छननन छुमछुम
तननन तुमतुम
रूमक झुमक जणू
पैंजण बोले
आली गुलाबी परी
रूमक झुमक जणू
पैंजण बोले
आली गुलाबी परी
इंद्रदरबारी नाचे सुंदरी
इंद्रदरबारी नाचे सुंदरी
इंद्रदरबारी नाचे सुंदरी

सुवर्णचाफा माझी कांती
देवगणांना पडली भ्रांती
हो... सुवर्णचाफा माझी कांती
देवगणांना पडली भ्रांती
नाग होऊनी डुलती सारे
माझ्या तालावरी
नाग होऊनी डुलती सारे
माझ्या तालावरी
इंद्रदरबारी नाचे सुंदरी
इंद्रदरबारी नाचे सुंदरी
इंद्रदरबारी नाचे सुंदरी

धा धा धिन् ता
किट् धा धिन् ता
तिटकट् गदि गन्

मदन खेचतो बाण
हरपूनी भान
करा रसपान
थै तत् थै
तक्राण तक्राण थै
तक्राण तक्राण थै
तक्राण तक्राण थै

दहा दिशांच्या ललना फिरती
शृंगाराला आली भरती
हो... दहा दिशांच्या ललना फिरती
शृंगाराला आली भरती
भल्याभल्यांचा संयम सुटतो
पिऊन रस माधुरी
भल्याभल्यांचा संयम सुटतो
पिऊन रस माधुरी

इंद्रदरबारी नाचे सुंदरी
हो इंद्रदरबारी नाचे सुंदरी
इंद्रदरबारी नाचे सुंदरी

उधळीत रंग बहार
नुपूर झंकार
सहज करी पदन्यास
जणू ही चंचल मृगनयनी
मदन मोहिनी

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*

स्वप्न परी मी तुझी प्रियतमा
नयनी माझ्या तुझीच प्रतिमा
हो स्वप्न परी मी तुझी प्रियतमा
नयनी माझ्या तुझीच प्रतिमा
दे आलिंगन तुझ्या प्रियेला
आतूर मी अंतरी

दे आलिंगन तुझ्या प्रियेला
आतूर मी अंतरी

इंद्रदरबारी नाचे सुंदरी
इंद्रदरबारी नाचे सुंदरी
इंद्रदरबारी नाचे सुंदरी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*